जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेस नोट क्र. १६२** **दिनांक १६/०६/२०२१**

## पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या कुख्यात अंतरराज्यीय घोडासहान, टोळीस गजाआड करण्यात गुन्हे शाखा, कक्ष-३ विरार यांना यश.

दिनांक १५/०६/२०२१ रोजी गुन्हे शाखा कक्ष-३ चे अधिकारी यांना नालासोपारा पुर्व संतोषभुवन येथील पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याचे तयारीत असलेल्या गुन्हेगाराबाबत खात्रीशीर मिळालेल्या बातमीवरुन मा. पोलीस उप आयुक्त गुन्हे, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३, गुन्हे शाखा, कक्ष -२ , व तुळींज पोलीस ठाणे यांनी संयुक्त कारवाई करुन नालासोपारा पुर्व, संतोषभुवन येथील पेट्रोल पंपावर दरोडा टाकण्याचे तयारीत असलेली **कुख्यात अंतरराज्यीय घोडासहान शटर कटवा** टोळीतील आरोपीत नामे- १) नईम हदिस देवान वय - ४८ वर्षे, २) विक्रम कुमार प्रेमचंद प्रसाद वय २५ वर्षे, ३) नईम मुन्ना देवान वय- २५ वर्षे, ४) सुहेब अहमद जहीर अहमद वय ४५ वर्षे, ५) विजयकुमार जयलाल महतो, वय २५ वर्षे, ६) अस्लम साई हफीजुल साई वय २७ वर्षे, ७) धर्मेद्र गजेंन्द्र सहानी वय २९ वर्षे, ८) विकेशकुमार मटर पासवान वय - १९ वर्षे, ९) रोहीतकुमार रामेश्वर पासवान वय - १९ वर्षे, सर्व राहणार घोडासहान बिहार, १०) ओमनाथ कुमार जवाहारलाल सहा वय - २४ वर्षे, रा. देश - नेपाळ यांना शिताफीने ताब्यात घेवुन त्यांचे कब्जातुन लोखंडी कोयते, बॅट-या, पिवळया रंगाच्या नायलॉनच्या दो-या, चार लोखंडी कटावण्या, लाल मिरची पुड, मोबाईल फोन व रोख रक्कम असा १,६४,८१०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

नमुद आरोपीत विरुध्द तुळींज पोलीस ठाणे गु.र.क्र.७६८/२०२१ भा.द.वी.सं.कलम ३९९ , ४०२, भा.ह.का. कलम ४,२५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील कारवाई करीता तुळींज पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे.

नमुद आरोपीत यांचा १) विरार पोलीस ठाणे गु.र.क्र.१७८/२०२१ भा.द.वी.सं.कलम ४५४,४५७,३८० प्रमाणे , २)नालासोपारा पोलीस ठाणे गु.र.क्र ३३८/२०२० भा.द.वी.सं. कलम ४५४,४५७, ३८० प्रमाणे तसेच ३) दिडोशी पोलीस ठाणे (मुंबई) १०४/२०२१ भा.द.वी.सं. कलम ४५७, ३८० प्रमाणे गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला आहे.

वरील आरोपीत याची गुन्हे करण्याची कार्यपध्दत हि मोबाईल / घडयाळाचे मोठया शॉपचे शटरच्या बाहेर चादर लावुन त्याआडुन शटर उचकटुन त्याव्दारे दुकानात प्रवेश करुन लाखो रुपये किंमतीचे मोबाईल फोन / घडयाळे चोरुन तात्काळ रेल्वे व्दारे पसार होण्याची आहे. उक्त आरोपीत याचे कार्यक्षेत्र हे महाराष्ट्र, दिल्ली, गुजरात, आंध्रप्रदेश, कर्नाटक, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तरप्रदेश, उत्तराखंड , तेलंगणा हे राज्य असुन सदर राज्यातील विविध पोलीस ठाणे येथे वरील आरोपीत यांचेवर गुन्हे नोंद आहेत.

सदरची कारवाई श्री. डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त सो.(गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा.पोलीस आयुक्त सो.(गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष -३ , गुन्हे शाखा, कक्ष -२ व तुळींज पोलीस ठाणे येथील अधिकारी व अंमलदार यांनी कौशल्यपुर्वक पार पाडली आहे.

...............ooooooo.............